Civil Services (Main) Examination, 2024

**PHKM–B–MRTH**

# मराठी (प्रश्न-पत्र–II)

( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

# MARATHI (PAPER—II)

( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* परसरामबासीं धाकुटें आचारस्थळ आणि वीचारस्थळ करणें: केशोबासीं रत्नमाळास्तोत्र करीतां। चांदह सते नीवडिलीं होतीः तथांतु आणिक कांहीं प्रश्ना (म) बासी नीवडुनी घातलीः मग प्रश्ना (म) बासी गोपाळ बासाचेनी संवादेंः अन्वयो लाउनी धाकुटें आचारस्थळ आणि वीचारस्थळें केलेंः

*(b)* ''स्वतःस मात्र सुख होण्याकरिता एकंदर सर्व मानवी प्राण्यास कायिक व मानसिक पिडा दिली नाही, म्हणजे त्यासच पुण्य म्हणावे.''

*(c)* माझा कोठलाही खिसा तुम्ही तपासून पहा! त्यात तुम्हाला वाळलेली गुलाबाची फुलं, जाईच्या सुकलेल्या वेण्या, चुरगळलेले हातरुमाल, बांगड्यांचे तुकडे आणि हिरव्या पोतीचे मणी-आणखीन किती तरी गोष्टी सापडतील! हे तर आमच्या काव्याचं सारं भांडवल आहे. कवीचे खिसे म्हणजे सुंदर स्त्रियांच्या हरवलेल्या जिनसा सापडण्याचे हमखास ठिकाण असे समजावे.

*(d)* आम्ही वस्तीतून बाहेर आल्यावर काशीनाथ मला म्हणाला, ''मास्तर, चला पोलीस स्टेशनवर''

''नको.''

''तुम्ही या मूर्खांचा मार सहन केला तरी कसा?''

''त्यांचा मार मी कुठे खाल्ला? मनूने मला मारलं! चल काशीनाथ....''

*(e)* पळून जावं वाटायचं. पण कसं जाऊ. आलतो तितून नको नको म्हणाले तेयनी तरी व इतं हेयच्या पेचात सापडलो होतो. कसा कुण्या तोंडानं पळून जाऊ वाटू लागल. असं करु तर कसं व्हईल तसं करु तसं कसं व्हईल. ईकडे आड तिकडे हीर. आगीतून उटून फोफाट्यात पडल्यावानी वाटू लागलं. पण वाटायचं की बाबा. जातील हे बी दिवस.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि भौगोलिक परिस्थितीचे चित्र स्मृतिस्थळातून कसे साकार झाले आहे ते सविस्तर वर्णन करा. 15

*(b)* 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातून अभिव्यक्त होणारी, मानवी जीवनासंबंधी महात्मा फुले यांची भूमिका स्पष्ट करा. 15

*(c)* नैतिक दृष्ट्या स्खलनशील स्त्री-पुरुष संबंधांचा विचार 'ब्राह्मणकन्या' कादंबरीत केतकरांनी कसा केला आहे, चर्चा करा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'साष्टांग नमस्कार' या नाटकात छांदिष्ट माणसांचे एक संपूर्ण विश्वच साकारले आहे. असे तुम्हाला वाटते का? साधक-बाधक चर्चा करा. 15

(b) 'जन हे वोळतू जेथे' या कादंबरीतील नायकाच्या संघर्षाचे स्वरूप स्पष्ट करा. 15

(c) " 'शिळान' संग्रहातून उद्धव शेळके यांच्या व्यापक अनुभवविश्वाचे प्रत्ययकारी दर्शन घडते" या विधानाचा परामर्श घ्या. 20

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) "बाबूराव बागूल हे दलित जीवनाचे सर्वश्रेष्ठ कथाकार आहेत." 'जेव्हा मी जात चोरली होती'च्या आधारे स्पष्ट करा. 15

(b) 'एकेक पान गळावया' या कादंबरीचा आकृतिबंध उलगडून दाखवा. 15

(c) "मराठवाड्यातील दलित जीवनातील दैन्य, दास्य आणि असह्य दुःख 'आठवणीचे पक्षी' मधून पाझरते" या विधानाची विस्तृत चर्चा करा. 20

## SECTION—B

**5.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) सुई आणि सातुळी कात्री गज दोरा। मांडिला पसारा सदाशिवी नामा म्हणें शिवीं विठोबाचे अंगी। त्याचेनि मी जगी धन्य झालो॥

(b) सुंदरा मनामधिं भरली जरा नाहि ठरली हवेलिंत शिरली मोत्याचा भांग
रे गड्या हौस नाहिं पुरलि म्हणोनी विरलि पुन्हा नाहिं फिरलि कुणाची सांग॥

(c) त्यातील एक कलहंस तटी निजेला
जो भागला जलविहार विशेष केला
पोटीच एक पद, लांबविला दुजा जो
पक्षी तनू लपवि, भूप तया पाहतो.

(d) परी भव्य तें तेज पाहून पूजून
घेऊं गळ्याशी कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे.

(e) अनेक असले खेळ करु प्रेमाशा विश्वांत भरु,
सोडुनिया अपुले श्वास खेळवु नाचवु उल्हास
प्रभातकाळी नामनिराळी
होउनिया आपण राहू लोकांच्या मौजा पाहू

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) "नामदेवाच्या अंतरंगाचे अत्यंत स्वच्छ व नितळ प्रतिबिंब त्यांच्या अभंगवाणीत पाहावयास मिळते." या विधानाची सत्यता पटवून द्या. 15

(b) शाहिरी वाङ्मयाला 'मराठी काव्याची प्रभात' असे का म्हटले जाते ते स्पष्ट करा. 15

(c) रघुनाथ पंडितांच्या 'दमयंती स्वयंवर' या आख्यान काव्याची कलात्मक वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) बालकवींच्या कवितांमधून दिसून येणाऱ्या निसर्गाच्या विविध भावछटा उलगडून दाखवा. 15

(b) "कुसुमाग्रजांच्या कवितेतून अपार जीवननिष्ठा सतत प्रवाहित होत असते." 'विशाखा' काव्यसंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा. 15

(c) 'मृद्गंध' या संग्रहातून करंदीकरांची सामाजिक जाणीव आणि इहवादी दृष्टिकोन ठाशीवपणे व्यक्त होतो. साधार पटवून द्या. 20

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'जाहीरनामा' या काव्यसंग्रहातून नारायण सुर्वे यांचा मानवतावादी दृष्टिकोन कसा अभिव्यक्त होतो? चर्चा करा. 15

(b) कवी ग्रेस यांच्या काव्याची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) 'या सत्तेत जीव रमत नाही' मधील कविता नामदेव ढसाळांच्या काव्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या कविता आहेत. साधार पटवून द्या. 20

★ ★ ★